# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
## कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर- ४१६ ००४

---

क्र.कोविमं/माध्य.गोप./परीक्षा / 3159
दिनांक :- ०१ / ०२ /२०२०

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर

**विषय:- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा फेब्रु/मार्च२०२० तोंडी परीक्षेचे साहित्य वितरणाबाबतच्या सुचना.**

कोल्हापूर विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा प्रमुखांना कळविण्यात येते की, माध्यमिक शालांत प्रमाणपत्र(इ.१०वी) परीक्षा फेब्रुवारी/मार्च २०२० ला प्रविष्ठ होणाऱ्या विद्यार्थ्याच्या विज्ञान प्रात्यक्षिक, तंत्र व पुर्व व्यावसासिक, शरीरशास्त्र, आरोग्यशास्त्र व गृहशास्त्र, विषयाची प्रात्यक्षिक परीक्षा व तोंडी परीक्षा गुरूवार दिनांक १३/०२/२०२० ते सोमवार दिनांक ०२/०३/२०२० या कालीवधीत, तसेच आऊट ऑफ टर्न परीक्षा मंगळवार दिनांक २४/०३/२०२० गुरूवार दिनांक २६/०३/२०२० या दोन दिवसांच्या कालावधीत आयोजीत करण्यात येत आहेत. **प्रात्यक्षिक /तोंडी परीक्षेचे साहित्य शुक्रवार दिनांक ०७/ ०२ /२०२० रोजी संबधित वितरण केंद्रावर सकाळी १० ते ५ .०० या वेळेत वाटप करण्यात येणार आहे याची सर्व शाळा प्रमुखांनी नोंद घ्यावी.**

सदर साहित्य स्विकारण्यासाठी आपल्या अधिकार पत्रासह प्रतिनिधी पाठवून मार्च २०२० परीक्षेचे साहित्य स्विकारण्यात यावे. साहित्य वेळेत न नेल्यास विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक / तोंडी परीक्षा वेळेत होऊ शकली नाही तर त्याची सर्वस्वी जबाबदारी आपणावर राहील याची नोंद घ्यावी.

विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ,कोल्हापूर